



दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : २८५
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, मंगळवार, दि.२७ मे २०२५


## थोडक्यात

### सिन्नर तालुक्यात जोरदार पाऊस..
### सिन्नर बसस्थानकाचा स्लॅब शिवशाही बसवर कोसळला



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२५, विंचूर (नाशिक) :** सिन्नर शहरासह तालुक्यात मान्सूनपूर्व पावसाचे आगमन झाले असून, आज मुसळधार पाऊस कोसळला आहे. या पावसाचा फटका सिन्नर बसस्थानकाला बसला आहे.

तुफानी पावसामुळे सिन्नरच्या हायटेक बसस्थानकाचा काही भाग कोसळल्याची घटना घडली आहे. स्लॅबचा काही भाग शिवशाही बस वर तसेच एका खाजगी कारवर कोसळला.त्यामुळे शिवशाही बसचे नुकसान झाल्याचे समजते. बसमधील सर्व प्रवाशांना सुखरूप बाहेर काढण्यात आले आहे. सुदैवाने कोणतीही जीवित हानी झाली नाही. खबरदारीचा उपाय म्हणून संपूर्ण बसस्थानक रिकामा करण्यात आला आहे. पावसाचे पाणी साचल्याने शहरातील रस्ते काही काळासाठी बंद झाले असून, वाहतूक ठप्प झाली होती. पावसामुळे बसस्थानकातील सदर घटना घडल्याचे सांगण्यात येत आहे. परंतु, हा भाग नेमका कशामुळे कोसळला हे अद्याप समजू शकलेले नाही.

ग्रामीण भागात देखील दमदार पाऊस बरसत असून, नद्या आणि नाल्यांना पूर आल्याचे चित्र बघायला मिळत आहे. पावसामुळे शेतीमालाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे प्राथमिक अंदाज आहे. सिन्नर शहरात ग्रामीण भागात मुसळधार पाऊस झाला असून त्यामुळे सरस्वती आणि देव नदीला पूर आला आहे.

### स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी एकजुटीने तयारी करा
### पारनेर शिवसैनिकांना उद्धव ठाकरेंचा आदेश । मातोश्रीवर बैठक



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२६, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील शिवसैनिकांनी आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीसाठी एकजुटीने पूर्ण ताकदीने तयारी करावी, असा स्पष्ट आदेश शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी दिला.

पारनेर तालुका शिवसेना तालुकाप्रमुख डॉ. श्रीकांत पठारे यांच्या नेतृत्वात तालुक्यातील शिवसेनेच्या पदाधिकारी आणि निवडक शिवसैनिकांच्या मातोश्री वरील बैठकीत ठाकरे यांनी आवाहन केले. या बैठकीत तालुक्यातील राजकीय परिस्थिती, नुकत्याच झालेल्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीतील शिवसेनेची भूमिका, तसेच इतर राजकीय पक्षांकडून शिवसैनिकांना मिळालेली सापत्न वागणूक यावर सविस्तर चर्चा झाली. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी शिवसैनिकांना संबोधित करताना सांगितले की, आगामी निवडणुकीसाठी पूर्ण ताकदीने तयारी करा.

महाविकास आघाडीने सहकार्य केल्यास ठीक, अन्यथा स्वतंत्रपणे निवडणुकीला सामोरे जा. कोणाची वाट पाहू नका. सर्वांनी एकजुटीने पक्षसंघटना वाढवावी. काही अडचण असल्यास माझ्याशी थेट संपर्क साधा, मी सर्वांसाठी उपलब्ध आहे. त्यांनी जुन्या आणि नव्या शिवसैनिकांना मतभेद बाजूला ठेवून एकत्र येण्याचे आणि शिवसेनेची ताकद दाखवून देण्याचे आवाहन केले. मागील राजकीय वाद विसरून नव्याने पुढे जाण्याचेही त्यांनी निर्देश दिले. या बैठकीत निष्ठावंत शिवसैनिकांचा सन्मान करण्यात आला. कुलाब्याचे माजी आमदार अशोकराव धात्रक यांच्या उपस्थितीत ही बैठक पार पडली. यावेळी तालुका प्रमुख डॉ. श्रीकांत पठारे, डॉ. भास्कर शिरोळे, उपसभापती किसनराव सुपेकर, संतोष साबळे, सुभाष भोसले, सखाराम उजगरे, बाबाजी तनपुरे, निलेश खोडदे, डॉ. कोमल भंडारी, संजय मते, दौलत सुपेकर, संतोष येवले, पिराजी पवार, शिवाजी लाळगे, मोहन पवार, जयसिंग पवार यांच्यासह अनेक शिवसैनिक उपस्थित होते.

**निवडणुकीत पूर्ण ताकदीनिशी उतरणार : डॉ. श्रीकांत पठारे**

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचा आदेश आमच्यासाठी सर्वप्रथम आहे. पारनेर तालुक्यात शिवसेनेची ताकद ही मोठी असून येणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत आम्ही पूर्ण ताकदीनिशी उतरणार आहे.

**– डॉ. श्रीकांत पठारे, पारनेर शिवसेना तालुकाप्रमुख (उबाठा)**

# ठाणे पाठोपाठ कल्याणमध्ये करोनाचा पहिला बळी

**अक्षराज : प्रतिनिधी**
**दि.२६, डोंबिवली :**

राज्यात एकीकडे पावसाचे आगमन झाल्यामुळे साथीच्या आजारानेही डोकं वर काढलं आहे. अशातच लोकांना विसर पडलेला करोना पुन्हा एकदा परतला आहे. दिवसेंदिवसे राज्यात कोरोनाबाधित रुग्णांच्या संख्येत वाढ होत आहे. ठाण्यापाठोपाठ आता कल्याणमध्ये एका महिलेचा करोनाची लागण झाल्यामुळे मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे आरोग्य यंत्रणेत खळबळ उडाली आहे. मागील काही दिवसांपासून करोनाच्या रुग्णांची संख्या वाढताना दिसत आहे. दोनच दिवसांपूर्वी कळवा परिसरात एका रुग्णाचा मृत्यू झाला होता.

आता कल्याण डोंबिवली म हापालिका क्षेत्रामध्ये कोविडचे चार पॉझिटिव्ह रुग्ण आढळले असून त्यातील एका महिला रुग्णाचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची माहिती महापालिके मार्फत जाहीर करण्यात आली आहे. कल्याण डोंबिवली महापालिका क्षेत्रामध्ये चार कोविडचे पॉझिटिव्ह रुग्ण आढळले असून त्यातील एका महिलेचा मृत्यू झाला असून दुसरा रुग्णाला उपचार करून घरी सोडण्यात आले आहे. तर तिसऱ्या रुग्णावर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहे.



चौथ्या रुग्णाला अधिक उपचारासाठी कळवा येथील शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आले असल्याचे डॉ. दीपा शुक्ल यांनी सांगितले. कल्याण डोंबिवली महापालिका क्षेत्रामध्ये कोविड या आजाराने जरी शिरकाव केला असला तरी नागरिकांनी घाबरून जाऊ नये आरोग्याची काळजी घ्या असा सल्ला देण्यात आला आहे. कल्याण डोंबिवलीतील नागरिकांनी सतर्क रहावे, वयोवृद्ध नागरिकांनी गर्दीच्या ठिकाणी जाऊ नये, वारंवार हात धुवावे, बाहेर जाताना मास्क लावून जावे आणि गर्दीच्या ठिकाणी जाण्यास टाळावे. कोणत्याही प्रकारचा काही त्रास झाल्यास जवळच्या खाजगी रुग्णालयात अथवा महापालिका रुग्णालयात जाऊन उपचार करून घ्यावा असा सल्ला डॉ शुक्ल यांनी दिला आहे.

राज्यात कोरोनाचा काही वर्षांपूर्वी कहर बघायला मिळाला. दैनंदिन जीवन पूर्णपणे ठप्प झाले होते. हेच नाही तर शाळा कॉलेज देखील बंद करून ऑनलाईन पद्धतीने विद्यार्थ्यांना शिक्षण घ्यावे लागत होते. करोनाच्या काळात अनेकांच्या नोकऱ्या देखील गेल्या होत्या. आता परत करोना डोके वर काढत असल्याने लोकांमध्ये चिंता बघायला मिळतंय. देशातही करोनाच्या रूग्णांची संख्या वाढली आहे.

# कळंब लातूर रस्ता बनतोय मृत्यूचा सापळा : रस्त्यावर गतिरोधक करण्याची मागणी

## * आतापर्यंत बऱ्याच लोकांनी गमावला जीव...



शिराढोण परिसरात या रस्त्यावर कुठेही गतिरोधक नाही, दिशा दर्शक फलक नाही, झेब्रा क्रॉसिंग नाही तसेच वेग मर्यादा फलक नाही त्या मुळे मागील तीन वर्षात बरेच अपघात झाले व गावातील बऱ्याच लोकांना जीव गमवावा लागला आम्ही या संदर्भात खूप वेळा बांधकाम विभागा कडे मागणी केली पण अद्याप त्यांनी याची पूर्तता केली नाही.

**– अमोल माकोडे, उपसरपंच, शिराढोण**

**अक्षराज : अशोक कुलकर्णी**

**दि.२६, कळंब :** कळंब लातूर रोड ची दुरावस्था लक्षात घेऊन प्रशासनाने या रस्त्याचे नव्याने डांबरीकरण केले नव्याने झालेल्या कामामुळे रस्त्याची रुंदी १०० फूट झाली असून रस्तेही गुळगुळीत बनले त्या मुळे वाहने सुसाट वेगाने धावत आहेत. शिराढोण व परिसरातील गावासाठी हा मार्ग अत्यंत उपयुक्त मानला जातो प्रत्येक गावातील नागरिकांची या रस्त्यावर विविध कामासाठी कायम वर्दळ पहायला मिळते. मुख्य बाजारपेठ असलेल्या शिराढोण खरेदीसाठी गावात लोकांची ये जा कायम असते आणि त्यांना येण्या जाण्यासाठी कळंब लातूर रोड वरून प्रवास करावा लागतो त्यात या भागात एक साखर कारखाना आहे. कारखान्याच्या कामासाठी नागरिकांना कळंब लातूर रोड वरूनच प्रवास करावा लागतो. लातूर ते कळंब हा रस्ता गुळगुळीत झाल्यामुळे लातूर आणि कळंब वरून प्रवाशांची कायम वर्दळ असते. हा रस्ता गुळगुळीत झाल्याने प्रवाशांचे गती वर नियंत्रण नसल्याने बरेच अपघात घडतात मागील तीन वर्षात बरेच लोक अपघातात मृत्यामुखी पडले.या रस्त्यावर शिराढोण परिसरात कुठेच गतिरोधक नाहीत. पुल अरुंद आहेत तसेच नव्याने चालू असलेल्या एम आय डी सी लातूर पाईप मुळे आणखीनच अपघातात भर पडताना दिसून येत आहे.या कडे प्रशासनाने लक्ष द्यावे ही मागणी नागरिकांतून होताना दिसते.

**अरुंद पुल ठरतायत ब्लॅक स्पॉट :** नव्याने बनलेल्या कळंब लातूर रोड चे काम झाले पण कळंब पासून लातूर पर्यंत एकही पुलाचे काम नव्याने झाले नाही त्या मुळे रस्त्याचे रुंदीकरण झाले पण पुलाचे नाही. सायंकाळी प्रवास करताना नवीन प्रवाशांना प्रवास करताना पुलाची कल्पना येत नाही आणि त्यात अपघात घडतात. या पूर्वी अरुंद पुलामुळे दोन लोकांना आपला जीव गमवावा लागला.

**शिराढोण परिसरात या ठिकाणी हवे गतिरोधक :** तडगाव वस्ती ते दाभा पाटी पर्यंत एक ही गतिरोधक पाहायला मिळत नाही. मुख्य म्हणजे विठ्ठल रुक्मिणी मंदिर रस्ता, आवाड शिरपूरा रस्ता, सौंदना आंबा रस्ता, शिराढोण उप रस्ता, पेट्रोल पंप चौक आदी भागात गतिरोधक बसने फार महत्वाचे आहे. मागील काही दिवसापूर्वी एक व्यक्ती अपघात होऊन मरण पावली आहे. गावातील नागरिकांनी बांधकाम विभागाकडे या बाबत ची मागणी बऱ्याच वेळी केली गेली पण त्यांच्याकडून आतापर्यंत काहीच गेले नाही.

**लातूर एम आय डी सी पाईप लाईन ठरतेय अपघाताचे कारण :** मांजरा डॅम ते एम आय डी सी लातूर या पाईप लाईन चे काम चालू आहे शिराढोण परिसरात रस्त्याच्या दोन्ही बाजूनी रस्त्या लगत पाईप टाकले गेले आहेत. व नवीन पाईप ची गाडी आल्यानंतर त्या गाडी तील पाईप उतरेपर्यंत गाड्या हया रस्त्यावर पार्क केल्या जातात. त्या मुळे वाहन चालवताना वाहन चालकांना कसरत करावी लागते. रस्त्या लगत पाईप टाकल्याने अपघाताचा धोका निर्माण होताना दिसत आहे.

**रस्त्यावर सकाळी जॉगिंग करताना घडतात अपघात :** शिराढोण गावातील बरेच लोक पहाटे व्यायाम करण्यासाठी व चालण्या साठी नित्याने कळंब लातूर रोड येतात पण या रोड वर कुठेही गतिरोधक नसल्याने वाहने सुसाट वेगाने धावतात. पहाटे कधी कधी धुके असल्याने चालकांना समोरील व्यवस्थित दिसत नाही अश्या वेळी अपघात घडतात. मागील एक वर्षांपूर्वी गावातील एक व्यक्तीला पहाटे चालताना वाहनाने धक्का दिल्या मुळे जीव गमवावा लागला. त्या मुळे गतिरोधक करण्याची मागणी नागरिकांतून होताना दिसते.

**दिशा दर्शक फलक किंवा वेग मर्यादा फलक कोठेच नाही :** या वाहतूकीच्या रस्त्यावर कुठेच दिशा दर्शक फलक लावले गेले नाही व वाहणास वेग मर्यादा फलक ही नाहीत त्या मुळे कुठे गाव आहे व कुठे लहान रस्ते आहेत याची प्रचिती चालकास येत नाही त्या मुळे अपघात घडताना पाहावयास मिळते.

# लुटेरी दुल्हन! तरुणाला पावणेतीन लाखांनी लुटले

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२६, बुलडाणा :** लग्नाचे नाटक करायचे, नंतर रितीरिवाज पार पाडायचे आणि रक्कम हाती लागताच फरार व्हायचे, असा फंडा वापरत नवरीची भूमिका करणाऱ्या मुलींसह टोळी सक्रिय झाली आहे. अशाच एका 'लुटेरी दुल्हन'ने मलकापूर तालुक्यातील एका लग्नाळू तरुणास पावणेतीन लाख रुपयांनी लुटल्याची घटना उघडकीस आली.

तरुणाशी लग्न करुन दुसऱ्या दिवशी नववधू आपली आई व मामासह फरार झाली आहे. तर दोन दलालांना अटक करण्यात पोलिसांना यश आले आहे. एका २८ वर्षीय तरुणाने मलकापूर ग्रामीण पोलिस स्टेशनला तक्रार दिली. दलालांनी त्याच्याकडून तब्बल २ लाख ७५ हजार रुपये उकळत त्याचे एका तरुणीशी लग्न लावून दिले. सत्यनारायणाची पूजा नवरीच्या गावी अकोला येथे ठेवण्यात आली.



पूजा होताच ठरल्याप्रमाणे 'खलनायका'चे पात्र वठविणे सुरू झाले. या नवविवाहित तरुणाला दलालांनी मारहाण करून हाकलून दिले. 'तुम्ही लग्न लावून दिले, माझ्या पत्नीला पाठवा अथवा पैसे मला परत द्या,' अशी गळ त्याने घातली. यावेळी त्याला खोट्या गुन्ह्यात अडकविण्याच्या धमक्या देण्यात आल्या. अखेर हताश होऊन परतलेल्या नवऱ्या मुलाने मलकापूर ग्रामीण पोलिसांत धाव घेतली. पोलिसांनी पाच जणांविरुद्ध गुन्हे दाखल केले.

**पुसद, मालेगावात सापडले दलाल...**

मलकापूर ग्रामीणचे पोलिस निरीक्षक संदीप काळे यांच्या मार्गदर्शनाखाली रवी बावस्कर, गणेश सूर्यवंशी, नीता मोरे यांनी होनाजी संभाजी खापरकर (वय ३७) याला पुसद जि. यवतमाळ येथून, तर लाला हरिश्चंद्र महाजन (वय ३६) याला मालेगाव जि. वाशीममधून अटक करण्यात आली. आरोपींकडून ५० हजार रुपये व दुचाकी जप्त करण्यात आली.

अक्षराज
२ | बुलडाणा, मंगळवार, दि.२७ मे २०२५ | विविधा

# संपादकीय



## माणसाचे वर्तन

आजकाल माणसाची जीवन जगण्याची पद्धत पूर्णपणे बदलून गेली आहे. माणूस माणसासारखे वर्तन न करता मोकाट जनावराप्रमाणे वागत करत आहे. मानवतेला अशोभनीय वर्तन करून माणुसकीला काळीमा फासत आहे. स्त्रिया, महिला व मुलींकडे स्वच्छ व निकोप दृष्टिकोनातून न बघता वासनांध व वखवखलेल्या नजरेने बघत आहे. सार्वजनिक ठिकाणी चार शहाण्या लोकांत जाऊन जोरजोराने बोलत आहे. आणि नाहक बोलून त्यांच्या चर्चेत व्यत्यय आणत आहे. म्हणजे आपण किती शहाणे व हुशार आहोत हे लोकांना दाखवून देत आहे. असेच म्हणावे लागेल. काही काही महाभाग तर रस्त्याने चालत असताना मुद्दाम छाती वर काढून चालतात. रस्त्याने जाणाऱ्या येणाऱ्या माणसांना व समाज बांधवांना साधा नमस्कार सुद्धा घालत नाहीत. माणुसकीच्या नात्याने चार शब्द न बोलता आपल्याच तोऱ्यात चालतात.म्हणजे आपण खूप शहाणे व स्पेशल आहोत, असे त्यांना वाटते. इतका गर्व आणि अहंकार काय कामाचा? असे मानवतेला अशोभनीय वर्तन काय कामाचे? आपला देश हा सुशिक्षित युवकांचा देश आहे. म्हणजे आपल्या देशात सुशिक्षित तरुणांची संख्या जास्त आहे. तरीही आपल्या देशातील बहुतांश लोक मानवतेला शोभणारे वर्तन करत नाहीत. हीच खरी देशाची शोकांतिका म्हणावी लागेल. देशात महिलांवरील अन्याय अत्याचाराच्या प्रमाणात प्रचंड वाढ झाली आहे. माणूस मानवतेला विसरून खुशाल राक्षसी कृत्य करत आहे. अल्पवयीन मुली व वृद्ध महिलांना दिवसाढवळ्या बलात्कार करून जिवंत जाळले जात आहे. जर एखादी महिला रस्त्याने जात असेल तर काही वासनांध पुरुष त्या महिलेवर अश्लील टिप्पणी करतात. तिला अश्लील भाषेत बोलून तिची मानहानी करतात. म्हणून आजकाल महिलांना व मुलींना संरक्षणाची नितांत गरज आहे. आपला देश विविध क्षेत्रात झपाट्याने प्रगती करत आहे. सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रात क्रांतिकारी बदल घडत आहे. आपला भारत देश महासत्ता होण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. पण आपल्या भारतीय लोकांच्या वर्तणुकीत अजूनही म्हणावा तसा अमुलाग्र बदल घडून आलेला दिसत नाही. माणूस अजूनही मानवतेला शोभणारे वर्तन न करता मानवतेला काळीमा फासणारे वर्तन करत आहे. घरातील आई-वडिलांचा, आजी आजोबांचा व गावातील ज्येष्ठ नागरिकांचा अपमान करत आहे. त्यांच्या शब्दांना व त्यांच्या विचारांना कवडीमोल समजत आहे. अशाप्रकारे माणूस मानवतेला अशोभनीय कृत्य करून माणुसकीला बट्टा लावत आहे. हल्ली माणसांची मने दूषित व गढूळ पाण्याप्रमाणे झाली आहेत. त्यांच्या मनात स्वार्थ, कपट आणि वासना ठासून भरलेली आहे. म्हणून ते माणसांसारखे न वागता सैतानासारखे वागत आहेत. बोलण्याला लिमिट न ठेवता कुठेही काहीपण व कितीही बरगळत आहेत. सार्वजनिक ठिकाणी आपल्या ओंगळ वर्तनाचे प्रदर्शन करत आहेत. स्वतःला भारी व श्रेष्ठ समजून दुसऱ्यांना कमी लेखत आहेत. आई वडील शेत नावावर करत नाहीत म्हणून आई-वडिलांना जीवे मारण्याचा प्रयत्न करत आहेत. गुंठाभर जागेसाठी सख्खे भाऊ पक्के वैरी बनून कोर्ट कचेरीच्या पायऱ्या चढत आहेत. तेव्हा माणुसकी रसातळाला गेली की काय? हा प्रश्न पडल्याशिवाय राहत नाही. माणूस एवढा कठोर आणि निष्ठूर हृदयाचा का झाला आहे? कळायला मार्ग नाही. हेच माणसाचे ओंगळवाणे वर्तन मानवतेला दूषित करत आहे. आपल्या भारत देशात अनेक थोर संत, महापुरुष, विचारवंत व तत्त्ववेत्ते जन्माला आले. त्यांनी आपल्या देशात चांगल्या विचारांची पेरणी करून चांगले वर्तन करण्याचा उपदेश केला. माणसाने माणसाशी माणसासम वागावे हा मानवतावादी संदेश दिला. आपल्या वर्तनातून लोकांवर एक आगळीवेगळी आणि जबरदस्त छाप सोडली. त्या मानवतावादी महापुरुषांचा नामोल्लेख आवर्जून करावा वाटतो. थोर विचारवंत तथागत गौतम बुद्ध, रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज, क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले, आरक्षणाचे जनक राजर्षी शाहू महाराज व मानवतेचे महानायक डॉ.बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषांनी आपल्या शुद्ध वर्तनाला कधीच डाग लागू दिला नाही. त्यांनी शेवटपर्यंत आपल्या वर्तणुकीला मानवतेची जोड दिली. या महापुरुषांमध्ये मानवता ठासून भरली होती आणि ती मानवता बावनकशी सोन्यासारखी झळकत होती म्हणूनच त्यांच्या वर्तनात मानवताच मानवता दिसत होती. आज संपूर्ण जग या महामानवांची प्रेरणा घेऊन आपल्या वर्तनात योग्य असा बदल करत आहे. तेव्हा समस्त भारतीयांना कळकळीची नम्र विनंती आहे की, बांधवांनो आपण आपल्या महापुरुषांचे आचार व विचार आत्मसात करून आपल्या वागण्यात, बोलण्यात व राहणीमानात योग्य असा बदल करून मानवतेला शोभणारे वर्तन ठेवावे...समाजात व गावात वावरत असताना स्वतःतील मानवता कलंकित होणार नाही याची दक्षता घ्यावी...तेव्हा नक्कीच आपला देश युद्धाच्या नव्हे तर बुद्धाच्या मार्गाने जाईल...कारण बुद्धाचा धम्म हा मानवतावादी आहे.

# आठवणीतील लग्न सोहळे...

आपल्या तरूण मुला मुलींचे थाटात लग्न लावून देणे प्रत्येक आईवडिलांचे स्वप्न असते. लग्न सोहळा कसा थाटात आणि झगमगाटात संपन्न झाला पाहिजे, जेवायला पंचपक्वान्ने, मठ्ठा आणि शीतपेयांची रेलचेल असावी, वरात दणाणून सोडणारी साऊंड सिस्टीम असावी. सगळे हौसे गौसे नाचून थकले पाहिजेत.लग्नसोहळा पाहून उपस्थित वऱ्हाडी मंडळी आणि सारा गाव थक्क झाला पाहिजे अशी बऱ्याच लोकांची धारणा असते. हे लक्षात घेऊन आपापल्या आर्थिक क्षमतेनुसार वधू किंवा वराचे आईवडील लग्न सोहळा दिमाखात पार पाडण्यासाठी अटोकाट प्रयत्न करतात. परंतु, गर्भश्रीमंत लोकांचे, खेळाडूंचे, नट आणि नट्यांचे लग्न सोहळे अगदी हातावर मोजता येतील इतक्या लोकांच्या उपस्थितीत आणि कमी खर्चात साजरे होतात हे लक्षात घेतले जात नाही.

बालपणापासून ते आजच्या प्रौढ अवस्थेपर्यंतच्या दीर्घ काळात मी अनेक लग्नसोहळे पाहिले. आम्ही लहान होतो तेव्हा लग्नाला जाणारे वऱ्हाड बैलगाडीने व ट्रॅक्टरने जायचे. नंतर ट्रकमधून वऱ्हाड जाताना आम्ही पाहिले व स्वतः इतरांच्या लग्नाला असे जाण्याचा हा अनुभव घेतला आहे. गरीबांच्या मुलामुलींच्या लग्नात पळसाच्या पानावर फक्त वरणभात खाल्ला आहे तर कधी शिरा भात खाल्ला आहे. बऱ्याच लग्न सोहळ्यात पुरणपोळीचे जेवण केले आहे. नंतर आले बुंदी, वळलेले लाडू, आता आले मोतीचूर लाडू किंवा बेसन वड्या आणि पनीरची भाजी.पुर्वी घरासमोर दारात मांडव घालून लग्न केले जायचे.आता शाळेच्या मैदानावर किंवा मंगलकार्यलयात लग्न साजरे होत आहेत.

पुर्वीचेलग्नसोहळे समाजापुरते मर्यादित होते.नंतर साऱ्या गावाला आमंत्रण दिले जाऊ लागले.आणि काही श्रीमंत व दानशूर लोक पंचक्रोशीतील सर्व गावकऱ्यांना लग्नाला येण्याचे आमंत्रण देऊ लागले. मला चांगले आठवते की आमच्या गावाच्या शेजारी असलेले फत्तेपूर हे लहानसे गाव आहे. त्या गावाचे पोलिस पाटील दिंगबरराव पाटील यांनी त्यांच्या थोरल्या मुलाचा लग्नसोहळा मोठ्या थाटामाटात साजरा केला होता. पंचक्रोशीतील सगळ्या गावातील सर्व जातीधर्माच्या सर्व लोकांना त्यांनी आमंत्रण दिले होते. त्यांच्या शेतातील रानात भव्यदिव्य मंडपात लोकांची तोबा गर्दी झाली होती. हा लग्नसोहळा माझ्या आठवणीतला एक चांगला लग्नसोहळा होता. कारण ज्या काळात गावोगावी जातीयता कटाक्षाने पाळली जायची त्या काळात दिंगबर पाटलांनी त्यांच्या मुलांच्या लग्नात बहुजनांना बोलावून त्यांचा सत्कार केला होता, जातीयतेला मातीत गाडून सर्वांना एकाच पंक्तीत बसवून आग्रहाने जेवण जेऊ घातले होते. हा लग्न सोहळा मानवी मनात समता रूजवणारा मैलाचा दगड ठरला होता.

माझ्या मोठ्या बहिण भावांचे लग्न करताना माझ्या वडिलांची खूप आर्थिक बेजारी झाली होती. परंतु, माझ्या लग्नाच्या वेळी माझे वडील हयात नव्हते. लग्नाच्या वेळी वडिलांची आठवण हृदय हेलावून



गेली. माझे लग्न अगदी साध्या पद्धतीने परंतु अनेक पाहुणे मंडळींच्या उपस्थितीत थाटात संपन्न झाले होते. माझ्या पत्नीच्या नातेवाईकांनी आमचा चांगला पाहुणचार केला होता. स्वयंपाक रूचकर आणि भरपूर बनवला होता.

नोकरीच्या गावात म्हणजे खंडाळी गावात अनेक लग्नसोहळे मी पाहिले. हे लग्न सोहळे थाटात साजरे होतात. विशेष बाब अशी की खंडाळी गावात कोणाच्याही लग्न सोहळ्यात सगळ्या जातीचे व धर्मांचे लोक सहभागी होतात. इथे कसलाच भेदभाव पहायला मिळत नाही आणि प्रत्येक लग्न थाटात साजरे होण्यासाठी सगळे गावकरी झटतात.आणि शिक्षक म्हणून आमचा सन्मान केला जातो ही विशेष बाब आहे. खंडाळी गावातील लग्न सोहळे समतेची शिकवण देतात. कोणी लहान नाही की कोणी मोठा नाही सगळे कसे एकसमान! माझे सहकारी शिक्षक मित्र शिवराज गोरगे यांची मुलगी डॉ.सुकन्या हिचा लग्न सोहळा काल थाटात संपन्न झाला. या लग्न सोहळ्याला सर्व क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. लग्नाचे स्टेज भव्य दिव्य बनवले होते. रोषणाई सुंदर आणि मनमोहक होती. लग्नातील झगमगाट लक्षवेधक होता. सुरुची भोजनाचा स्वयंपाक रूचकर झाला होता.

विशेष बाब म्हणजे संभाजी कासले सर, तुकाराम सुकणे सर, यशवंत मुंडकर सर आणि शिक्षण विस्तार अधिकारी बालाजी यरमुनवाड सर यांनी वऱ्हाडी मंडळीला जेवण वाढण्याचे छान काम केले. आम्हा मित्रपरिवाराला आग्रह करत त्यांनी जेवण वाढले. नाहीतर बऱ्याचदा शहरी भागातील लग्न सोहळे फिके पडत आहेत. कारण शहरी भागातील लग्न सोहळ्यात लग्नाची कामे करण्याची मानसिकताच लुप्त झाली आहे. परंतु, शिवराज गोरगे सरांच्या मुलीच्या लग्नात त्यांच्या नातेवाईकांनी, गावकऱ्यांनी आणि मित्रांनी खूप परिश्रम घेतले व हा विवाह सोहळा दिमाखात संपन्न झाला.

**- बबन दामोदर गुळवे**
**उमरगा कोर्ट ता.अहमदपूर**
**जि.लातूर.मो.९५४५४४२६४८.**

## खारघरच्या धबधब्यावर धारावीतील पाच विद्यार्थी अडकले



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२६, नवी मुबंई :** नवी मुबंईतील खारघर येथील धबधब्यावर धारावीतील काही विद्यार्थी अडकले होते. त्यांना बाहेर काढण्यात खारघर अग्निशमन दलाला यश आलं आहे. पाच विद्यार्थ्यांना रेस्क्यू टीमने सुरक्षित बाहेर काढले आहे. पावसाचा आनंद घेण्यासाठी हे विद्यार्थी आल्याची माहिती मिळालीये.

## विसंगत ..

मान्सूनचे आगमन
अंदाजात विसंगत
आतिथ्यशील सारे
हो सुहास्य स्वागत

नालेसफाईजोरात
उगाचं जाई लांबत
किती उचला गाळ
तुंबाई नाही थांबत

तयार न स्वयंपाक
बसवू ठेवली पंगत
सोहळ्या औचित्य
बेगडीसगळी रंगत

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

पावसाळी आजार
येती रोग्यास हुंगत
इस्पितळात यंत्रणा
सुस्त पडली खंगत

सुस्तावली वाहतूक
यंत्रणा होई अबर्गत
दोष खरा कुणाचा
वाद सरेना अंतर्गत

धोकादायक इमारत
वाट पाहतेयं खंगत
रहिवासी तिथेतिष्ठत
कारणे बसले सांगत

सिबीलस्कोअर अडे
पुरावा बसले मागत
कशा करालं पेरण्या
कर्जमंजूरी कलागत

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६.**

# वाचक पत्र



## 'पाक' प्रेमींवर कारवाई होणे गरजेचे !

विविध प्रकारच्या मिठाई ही राजस्थानची एक वेगळी ओळख आहे. असे म्हणतात मिठाई खाण्यात राजस्थानी मंडळींचा हात कुणीच धरू शकत नाही. राजस्थानची राजधानी असलेल्या जयपूर शहरात तर नाक्यानाक्यावर मिठाईची दुकाने पाहायला मिळतात. पहलगाम हल्ल्यानंतर येथील मिठाईवाल्यांनी एक अनोखा निर्णय घेतल्याने जयपूरची चर्चा आज संपूर्ण देशभरात केली जात आहे. येथील सर्व प्रसिद्ध मिठाईना 'पाक' हा शब्द जोडला जातो. 'गोंडपाक', 'म्हैसूरपाक', 'मावापाक', 'अंजीरपाक', 'काजूपाक', 'देसीपाक' अशी या मिठाईंची नावे आहेत. यापुढे या मिठायांना 'पाक' ऐवजी 'श्री' हा शब्द जोडला जाणार आहे. त्यामुळे 'गोंडपाक'चे नाव पालटून 'गोंडश्री' करण्यात आले आहे. 'म्हैसूरपाक'चे नाव पालटून 'म्हैसूरश्री' करण्यात आले आहे. पाक या शब्दाप्रती द्वेष निर्माण झाल्याने समस्त मिठाईवाल्यांनी हा निर्णय घेतला आहे. पाकिस्तानच्या निर्मितीच्याही आधी 'पाक' हा शब्द आपल्याकडे प्रचलित असला तरी पाकिस्तानप्रती द्वेष प्रकट करण्यासाठी जयपूरकरांनी घेतलेल्या या निर्णयाचे सर्वत्र कौतुक केले जात आहे. आजची देशाची स्थिती पाहता केवळ पदार्थाच्या नावातून 'पाक' शब्द हटवणे पुरेसे नसून भारतात राहून भारताचे खाऊन भारताशी वैरभावनेने वागणाऱ्या 'पाक'प्रेमींना देशातून हटवण्याची आवश्यकता आहे. पहलगाम हल्ल्यानंतर समस्त भारतवासीयांनी पाकिस्तानप्रतीचा आपला द्वेष विविध माध्यमांद्वारे प्रकट केला. काही ठिकाणी पाकिस्तानचे राष्ट्रध्वज रस्त्यावर तर काही ठिकाणी पादचारी पुलांच्या पायऱ्यांवर चिकटवण्यात आले होते, तेव्हा तेथील पाकप्रेमींचे पाकप्रेम उफाळून आले आणि त्यांनी ते ध्वज काढण्याचा प्रयत्न केला तर काही ठिकाणी यावरून दंगली घडवण्याचाही प्रयत्न करण्यात आला. देशात वास्तव्य करणाऱ्या पाकिस्तानी नागरिकांचा शोध घेत असताना देशातील लाखो महिलांनी पाकिस्तानी पुरुषांशी विवाह करून त्या आणि त्यांची मुले भारतातच राहत असल्याचे उघड झाले. या मंडळींकडे भारतीय नागरिकत्वाची सर्व कागदपत्रे होती. येथील सोयी सुविधांचा बिनदिक्कतपणे ही मंडळी लाभ घेत होती. याच दरम्यान पाकिस्तानच्या समर्थनार्थ सोशल मीडियातून पोस्ट करणारी काही मंडळीही उजेडात आली. खेळांच्या सामन्यात भारताचा पराभव झाल्यावर आणि पाकिस्तानचा विजय झाल्यावर फटाके फोडून आनंद व्यक्त करणारी पाकप्रेमी मंडळीही देशात बऱ्याच ठिकाणी आढळून येतात. ज्या ज्या वेळी भारतात आतंकवादी हल्ले होतात तेव्हा त्यांना साहाय्य करणारी देशद्रोही मंडळी भारतातील वस्त्यांतूनच पकडली जातात. आतंकवाद्याच्या जनाज्याला लाखोंची गर्दी करणारी, आतंकवाद्यांचे वकीलपत्र घेणारी, पाकिस्तानातून अवैधपणे भारतात येणाऱ्या घुसखोरांना आश्रय देणारी, त्यांच्या निवासाची आणि रोजीरोटीची सोय करणारी मंडळीही येथेच राहत आहेत. अशा 'पाक'प्रेमी मंडळींना शोधून त्यांच्यावर योग्य ती कायदेशीर कारवाई करणे आज निकडीचे असून त्यासाठी समस्त राष्ट्रप्रेमी नागरिकांनी संघटित होणे आवश्यक आहे.

**- सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई**

# हिमालयाची सावली ; त्यागमूर्ती माता रमाई

आज २७ मे, भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्नी रमाई यांची पुण्यतिथी. ७ फेब्रुवारी १८९७ रोजी माता रमाई यांचा जन्म एका गरीब कुटूंबात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव भिकू धोत्रे ( वलंगकर ) तर आईचे नाव रुक्मिणी असे होते. दाभोळजवळील वनंदगावात नदीकाठी महारपुरा वस्तीमध्ये त्या राहत होत्या. त्यांना तीन बहिणी व एक भाऊ होता. त्यांचे वडील दाभोळ बंदरात माशांनी भरलेल्या टोपल्या पोहचवत असत. रमाई लहान असतानाच त्यांच्या आईचे निधन झाले. काही दिवसांनी वडिलांचेही निधन झाले. लहान वयातच आई वडिलांचे छत्र हरपल्याने कोवळ्या रमाईच्या मनावर मोठा आघात झाला. आई वडिलांविना पोरक्या झालेल्या या भावंडांना वलंगकर काका व गोविंदपूरकर मामा यांनी मुंबईला आणले. मुंबईतील भायखळा मार्केटच्या चाळीत ते राहू लागले. त्याच सुमारास सुभेदार रामजी आंबेडकर हे आपल्या भीमरावसाठी मुलगी पाहत होते. वलंगकारांकडे लग्नाची मुलगी असल्याचे त्यांना समजले. सुभेदार रामजी आंबेडकर यांनी रमाईला पाहिले. रमाईला पाहता क्षणिच सुभेदाराने तिला आपल्या भीमरावासाठी पसंत केली. रमाई आणि भीमराव यांचा भायखळ्याच्या मार्केटमध्ये विवाह झाला. विवाहाप्रसंगी बाबासाहेबांचे वय चौदा तर रमाईचे वय नऊ वर्ष होत. त्यावेळी बाल विवाहाची प्रथा समाजात रूढ होती. लग्नात पंच पक्वान्ने नव्हती. झगमग रोषणाई नव्हती. अतिशय साध्या पद्धतीने हा विवाह पार पडला. माता रमाईला जीवनात अनेक दुःखे सहन करावी लागली. १९२३ साली बाबासाहेब लंडनला गेले. त्यावेळी रमाईची खुप वाताहत झाली. ती दुष्काळाच्या आगीत होरपळत होती. बाबासाहेबांच्या कार्यकर्त्यांना त्यांचे हाल पहावले नाही त्यांनी काही पैसे जमा केले व ते पैसे रमाईला देऊ केले. त्यांनी कार्यकर्त्यांच्या भावनांचा आदर केला मात्र पैसे स्वीकारण्यास नम्रपणे नकार दिला. रमाई या बाबासाहेबांप्रमाणेच स्वाभिमानी होत्या. माता रमाई या आयुष्यभर दुःखाशी, गरीबीशी जिद्दीने झगडत होत्या मात्र हार मानत नव्हत्या. मृत्यूसत्र, दुःख, त्याग, समजूतदारपणा , कारुण्य, उदंड मानवता आणि मृत्यू यांचे सर्जनशील ज्वलंत प्रेरणास्थान म्हणजे माता रमाई. रमाईने अनेक दुःखे झेलली. त्यांच्या इतके मरण कोणीही पाहिले नसेल. लहान वयातच आई वडिलांचा मृत्यू, १९१३ साली सासरे शुभेदार रामजी आंबेडकर यांचा मृत्यू, बाबासाहेबांचे मोठे बंधू आनंदराव, त्यांचा मुलगा गंगाधर यांचा मृत्यू, १९२१ साली बाबासाहेबांचा मुलगा बाळ गंगाधर, १९२६ मध्ये राजरत्न असे अनेक मृत्यू त्यांनी पाहिले पण त्या डगमगल्या नाहीत. पती बाबासाहेब आंबेडकर परदेशात शिकायला गेल्यावर त्या एकट्या घर चालवत होत्या. घर चालवण्यासाठी तिने शेण गोवऱ्या वेचल्या. बॅरिस्टर पतीची पत्नी शेण गोवऱ्या गोळा करते असे लोक नावे ठेवतील म्हणून त्या पहाटे लवकर उठून शेण गोवऱ्या गोळा करत. आयुष्यभर काबाड कष्ट करून त्यांचे शरीर पोखरून गेले होते. त्यामुळे त्या आजारी पडल्या. जानेवारी १९३५ पासून आजार वाढत गेला. मे १९३५ ला त्यांचा आजार विकोपाला गेला. बाबासाहेबांनी सर्व नामांकित डॉक्टरांना पाचारण केले. मात्र त्यांचे शरीर औषधोपचारांना प्रतिसाद देत नव्हते. बाबासाहेब त्यांना फळांचा ज्यूस, चहा, कॉफी पाजत. मात्र त्यांच्या तब्येतीत सुधारणा होत नव्हती. अखेर २७ मे १९३५ रोजी रमाईची प्राणज्योत मावळली. सर्व परिसर आकांतात बुडाले. बाबासाहेबांना हे दुःख पचवणे अवघड गेले. ते रमाईच्या पार्थिवाशेजारी बसून ढसाढसा रडले. जवळ जवळ तीस वर्षे हिमालयासारख्या महामानवाला धैर्याने व प्रेमाने साथ देणारी हिमालयाची सावली सोडून गेल्याने बाबासाहेब एकाकी पडले. हिमालयाची सावली बनलेल्या त्यागमूर्ती माता रमाई यांना पुण्यतिथी निमित्त विनम्र अभिवादन!

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## नवनियुक्त पोलिस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांचे स्वागत



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२६, नाशिक :** नाशिक ग्रामीणला नुकतेच रुजू झालेले नवनियुक्त पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांचा नाशिकच्या वतीने भारतीय क्रीडा विकास आणि पदोन्नती महामंडळ (दिल्ली) येथील उपाध्यक्ष डॉ. निलेश राणे यांनी स्वागत केले.

याआधी बाळासाहेब पाटील हे पालघरचे पोलीस अधीक्षक म्हणून कार्यरत होते. त्यांनी तिथे उत्कृष्ट कार्य करून सायबर क्राइम रोखण्यासाठी एआय चॅटबॉटवर सुविधा दिल्यात, यामुळे अपघातानंतर मदत आवश्यक असल्यास लोकेशन शेअर करता येते. या स्वरूपाचे कामकाज पाटील यांनी पालघर मध्ये केले. त्याची पुनरावृत्ती नाशिक ग्रामीण पोलीस दलात पण होऊ शकते.

तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतील शंभर दिवसाच्या कार्यक्रमांतर्गत पालघर पोलीसांनी बाळासाहेब पाटील यांच्या नेतृत्वात सर्वोकृष्ट कामगिरी केल्याने राज्यात प्रथम क्रमांक पटकावून पालघर पोलीस अव्वल ठरले आहे.

## श्याम ठाणेदार यांना महाराष्ट्ररत्न पुरस्कार !




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२६, पुणे :** नालंदा ऑर्गनायझेशन महाराष्ट्र राज्य आणि पुण्यातील टॅलेंट कट्टा (अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ संलग्न) संस्थेतर्फे महाराष्ट्रातील स्तंभलेखक श्याम ठाणेदार यांना महाराष्ट्ररत्न पुरस्कार देण्यात आला. महाराष्ट्ररत्न हा महाराष्ट्रातील मानाचा आणि प्रतिष्ठेचा पुरस्कार समजला जातो. २५ मे रोजी पुण्यातील पत्रकार भवन येथे झालेल्या दिमाखदार सोहळ्यात श्याम ठाणेदार यांना हा पुरस्कार देण्यात आला. २५ मे रोजी पुण्यातील पत्रकार भवन येथे झालेल्या दिमाखदार सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते श्याम ठाणेदार यांना हा मानाचा पुरस्कार देण्यात आला. सन्मानचिन्ह, सन्मानपत्र आणि पदक असे पुरस्काराचे स्वरूप होते. यावेळी अश्विनी जाधव संस्थापिका व्हायब्रंट सोशल फाऊंडेशन, नितीन धवणे पाटील (प्रसिद्ध उद्योजक मुंबई) जितेंद्र तुळशीराम दाते (चेअरमन एआरजे ग्रुप ऑफ इंडस्ट्री), डॉ नीता दोषी (प्रसिद्ध शास्त्रज्ञ संशोधन कृत्रिम पाऊस) दीपक जाधव (संस्थापक अध्यक्ष टॅलेंट कट्टा) आदी मान्यवर उपस्थित होते. श्याम ठाणेदार हे महाराष्ट्रातले प्रसिद्ध स्तंभ लेखक असून महाराष्ट्रातील विविध वर्तमानपत्रात ते नियमितपणे स्तंभ लेखन करतात. महाराष्ट्रभर त्यांचा वाचक वर्ग आहे. श्याम ठाणेदार यांच्या सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रातील प्रबोधनात्मक लेखन कार्याची दखल घेऊन त्यांना हा मानाचा पुरस्कार देण्यात आला. स्तंभ लेखनातील त्यांच्या योगदानामुळे त्यांना यापूर्वीही अनेक पुरस्कार मिळाले आहेत. महाराष्ट्ररत्न पुरस्कार मिळाल्याने श्याम ठाणेदार यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## साताऱ्यातील दुष्काळी तालुक्यामध्ये पावसाची जोरदार बॅटिंग



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२६, माण (सातारा) :** सातारा जिल्ह्यातील फलटण आणि माण या दुष्काळी तालुके अशी ओळख असलेल्या तालुक्यांना पावसानं झोडपलं आहे. सातारा जिल्ह्यात गेल्या काही दिवसापासून जोरदार पाऊस सुरू आहे. कृष्णा नदीच्या पाणी पातळीत देखील वाढ झाल्याचं पाहायला मिळालं होतं. आता सातारा जिल्ह्यातील माण आणि फलटण तालुक्यामध्ये देखील पावसानं तुफान बॅटिंग केली आहे. माण तालुक्यात अनेक रस्ते पाण्याखाली गेले तर शिंगणापूर परिसरात ढगफुटी सदृश्य पाऊस झाला. फलटण तालुक्याला पावसाने तडाखा दिला आहे. फलटण तालुक्यात २५१. किलोमीटर पावसाची नोंद झाली. फलटण तालुक्यात तील वेगवेगळ्या २४ ठिकाणी पुलावरून पाणी वाहू लागले यामुळे प्रशासनानं सतर्क राहण्याचं आवाहन केलं आहे.

## विंचूर येथे मंत्री छगन भुजबळ यांचे जल्लोषात स्वागत



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२६, विंचूर (नाशिक) :** येवला- विंचूर विधानसभा मतदारसंघाचे विकासपुरुष ना.छगन भुजबळ यांनी मंगळवारी कॅबिनेट मंत्री म्हणून शपथ घेतली. मंत्रिमंडळातील समावेशानंतर ना. भुजबळांचे प्रथमच मतदारसंघात आगमन झाल्याने विंचूरकर ग्रामस्थ व महायुतीच्या कार्यकर्त्यांनी ना. भुजबळांचे जल्लोषात स्वागत केले.

विंचूर येथील प्रभू श्रीराम चौकात ना. भुजबळांचे पारंपरिक वाद्यांच्या गजरात, फटाक्यांची आतषबाजीच फुलांची उधळण करीत तसेच क्रेनच्या सहाय्याने पुष्पहार घालून स्वागत करण्यात आले. कार्यकर्त्यांनी 'भुजबळ साहेब तुम्ही पुढे चला, आम्ही तुमच्या सोबत आहोत' अशा घोषणा देत परिसर दणाणून सोडला. यावेळी माजी जिल्हा परिषद अध्यक्ष पंढरीनाथ थोरे, तालुकाध्यक्ष भाऊसाहेब भवर, राजाभाऊ शेलार, बाजार समिती संचालक सुवर्णा जगताप, डॉ. श्रीकांत आवारे, प्रकाश दायमा, कैलास सोनवणे, सचिन दरेकर, मनोज जैन, बाळासाहेब पुंड, मंगेश गवळी आदींसह विचूरकर ग्रामस्थ व महायुतीचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# दिवा विभागातील टोरेंट कंपनीचे वारंवार वीजपुरवठा खंडित – नागरिकांत तीव्र नाराजी

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२६, दिवा (ठाणे) :** दिवा विभागातील नागरिक सध्या वारंवार होणाऱ्या टोरेंट कंपनीचा वीजपुरवठा खंडिततेमुळे मोठ्या अडचणीत सापडले आहेत. दिवसातून अनेक वेळा वीज खंडित होत असल्यामुळे घरगुती कामकाज, पाणीपुरवठा, विद्यार्थी व कर्मचाऱ्यांचे ऑनलाईन काम, दुकानदार व लहान व्यावसायिकांचे व्यवहार ठप्प होत आहेत.



नागरिकांनी वारंवार तक्रारी करूनही प्रायव्हेट वीज वितरण कंपनीकडून याबाबत ठोस उपाययोजना झालेली नाही. परिणामी लोकांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. यामुळे फ्रीज, पंखे, टीव्ही, वॉशिंग मशीन यासारख्या महागड्या उपकरणांचे नुकसान होत आहे. तसेच रुग्णालये, शाळा, ऑफिस यांसारख्या महत्त्वाच्या ठिकाणीही या समस्येचा परिणाम जाणवतो आहे. स्थानिक नागरिक, सामाजिक संस्था आणि व्यापाऱ्यांकडून संबंधित कंपनीला तातडीने पुढाकार घेऊन दोष दूर करावा, तांत्रिक दुरुस्ती करावी, आणि वीजपुरवठा सुरळीत ठेवावा, अशी मागणी करण्यात येत आहे. जर तातडीने लक्ष दिले गेले नाही, तर नागरिकांनी तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे. संपूर्ण विभागातील नागरिकांची ही समस्या गंभीर असून, प्रशासनानेही लक्ष घालून वीज वितरण कंपनीला कठोर सूचना द्याव्यात, अशी मागणी कल्याण ग्रामीण विधानसभा प्रमुख रोहिदास मुंडे यांनी पत्राद्वारे केली आहे. निवेदन देताना यावेळी दिवा शहर महिला संघटिका ज्योती पाटील, युवा सेना शहर अधिकारी अभिषेक ठाकूर, उपशहर संघटक प्रवीण उतेकर, विभाग प्रमुख राज रसाळ, उपविभाग प्रमुख संदीप राऊत, गजानन शेलार, टोरेंट पॉवर कंपनीचे अधिकारी श्री.पांचाल, श्री.संघषण खोब्रागडे उपस्थित होते.

# अवकाळी पावसाने उडवली झोप; पेरणीपूर्व मशागतीची कामे रखडली



> आकाशात विजांचा कडकडाट सुरू झाला की शेतातील कामे लगेच थांबवावी लागतात. शिवाय पावसामुळे शेतात चिखल झाल्याने नांगरणी करणेही शक्य नाही. यामुळे खरीपपूर्व मशागतीची कामे लांबणीवर पडली आहेत. पावसाळ्यापूर्वीच पाऊस सुरू झाल्याने प्रत्यक्षात पावसाळ्यात पाऊस पडतो की नाही, याची चिंता स्वस्थ बसू देत नाही.
>
> **– अण्णा वराळे, शेतकरी, मुळेवाडी**

**अक्षराज : विश्वास वराळे**

**दि.२६, तेर (धाराशिव) :** मे महिना शेतकऱ्यांसाठी खरीपपूर्व मशागतीचा महिना म्हणून ओळखला जातो. मात्र, यावर्षी संपूर्ण मे महिन्यात अवकाळी वातावरण असल्याने बळीराजाची झोप उडाली आहे. लवकर पावसाळा सुरू झाल्याने परिसरातील शेतकरी चिंतेत दिसत आहेत. आता खरीप पूर्व मशागत करावी तरी केव्हा, असा प्रश्न बळीराजापुढे आहे.

मे महिन्याच्या प्रारंभी लग्न समारंभ उरकण्याकडे बळीराजाचा कल असतो. त्यानंतर मे महिन्याच्या मध्यापासून शेतकरी खरीप पूर्व मशागतीच्या कामात गुंतत असतो. विशेषतः या काळात नांगरणीची कामे केली जातात. मात्र, यावर्षी मे महिन्याच्या प्रारंभीपासून अवकाळी म्हणून आलेल्या पावसाने चांगलेच बस्तान बसविले असल्याने आता बळीराजा चिंताग्रस्त दिसत आहे. मृग नक्षत्र तोंडावर असल्याने खरीपपूर्व मशागतीची कामे कधी करायची, असा प्रश्न बळीराजाला सतावत आहे.

**आठ दिवसांपासून अवकाळी पाऊस**

गेल्या आठ दिवसांपासून या भागात रोज अवकाळी पाऊस हजेरी लावत आहे. यामुळे शेतीची कामे करावी कशी, असा प्रश्न शेतकऱ्याला पडला आहे. अवकाळीमुळे नदी, नाल्यांना पाणी आले आहे. आतापासून पाऊस सुरू झाल्याने पावसाळ्यात अपेक्षित वेळी पाऊस होईल का, अशीही शंका शेतकरी व्यक्त करीत आहेत.

# माता महाकाली मंदिरात पोलिसांचे 'मॉकड्रील'

## 'दहशतवादी हल्ला, ओलीस मुक्तता' वर रंगित तालीम

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२६, चंद्रपूर :** भविष्यात दहशतवादी हल्ला झाल्यास व ओलीस नागरीकांची सुटका कशी करावी याबाबत चंद्रपूर येथील आराध्य दैवत श्री माता महाकाली मंदीर परिसरात जिल्हा पोलीस प्रशासना तर्फे पोलीस अधिक्षक मुम्मका सुदर्शन सा. यांचे मार्गदर्शनात रंगीत तालीम ची प्रात्यक्षिक घेण्यात आले.



रंगीत तालीम प्रात्यक्षिक मध्ये चंद्रपूर येथील माता महाकाली मंदीर परीसरात चार दहशतवादी अचानकपणे प्रवेश करून दर्शनासाठी आलेल्या भाविकांना शस्त्राचा धाक दाखवुन ओलीस ठेवले आहे अशी माहिती मंदीर परीसरातुन १४:४० वा. चे दरम्यान पोलीस कंट्रोलरूम येथे मिळाल्यावर योगेश्वर पारधी, पोलीस निरीक्षक ज़िवीशा तथा प्रभारी पोलीस उपअधिक्षक (गृह) यांनी कंट्रोलरूम येथुन वरिष्ठांशी योग्य समन्वय साधुन सर्व पथके तात्काळ सर्व पथक ज्या मध्ये दहशतवाद विरोधी शाखा, जलद प्रतिसाद कमांडो पथक, दंगा नियंत्रण पथक, बॉम्ब शोधक व नाशक पथक, श्वान पथक, नक्षल सेल तथा नक्षल विरोधी अभियान पथक, सुरक्षा शाखा, पो.स्टे, चंद्रपुर शहर व रामनगर, स्थानिक गुन्हे शाखा येथील विविध पोलीस पथक, वाहतूक नियंत्रण पोलीस पथक, राज्य गुप्तवार्ता विभाग चे अधिकारी, अंमलदार, पोलीस रुग्णालय वैद्यकीय चमु वाहनासह घटनास्थळी हजर झाले.


वरिष्ठ अधिकारी अप्पर पोलीस अधिक्षक रिना जनबंधू यांचेसह उपविभागीय पोलीस अधिकारी चंद्रपुर सुधाकर यादव हे तात्काळ घटनास्थळी हजर होऊन अपर पोलीस अधिक्षक रिना जनबंधु यांनी घटनास्थळाची सुत्रे हातात घेऊन उपविभागीय पोलीस अधिकारी चंद्रपूर यांच्या नेतृत्वाखाली उपस्थित सर्व पोलीस पथकांनी योग्य खबरदारी बाळगून कोणत्याही प्रकारची जीवहानी होऊ न देता मंदीर परिसरात शिरलेल्या दहशतवाद्यांचा यशस्वी रित्या खात्मा करून त्यांच्या ताब्यातील ओलीस असलेल्या नागरीकांची सुखरूप सुटका करण्याची कारवाईचे प्रात्यक्षिक पुर्ण केले. सदर प्रात्यक्षिक वेळी मंदीर परिसरात व शहरात नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण होऊ नये यासाठी योग्य ती खबरदारी घेवून पुरेसा पोलीस बंदोबस्त लावण्यात आला होता.

सदर प्रात्यक्षिक यशस्वीरित्या पुर्ण करण्यासाठी पोलीस अधिक्षक मुम्मका सुदर्शन यांचे मार्गदर्शनात अपर पोलीस अधिक्षक रिना जनबंधू, उपविभागीय पोलीस अधिकारी चंद्रपुर सुधाकर यादव यांचे नेतृत्वात प्रमोद चौगुले, परि. पोलीस उपअधीक्षक, प्रवीण कुमार पाटील, पोलीस निरीक्षक वाहतूक शाखा, अमोल काचोरे पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा, योगेश्वर पारधी, पोलीस निरीक्षक, जिल्हा विशेष शाखा, प्रभावती एकुरके, पोलीस निरीक्षक,पो.स्टे. चंद्रपूर शहर धर्मेद्र मडावी, सहा.पोलीस निरीक्षक, सी.६० प्रवीण सोनोने, सहा.पोलीस निरीक्षक, वाहतूक शिरभाते, पोलीस उपनिरीक्षक, सेक्युरिटी ब्रँच खोंडे, पोलीस उपनिरीक्षक, बीडीडीएस भोयर, पोलीस उपनिरीक्षक, एटीबी पोलीस वैद्यकीय अधिकारी डॉ. कुरेशी तसेच पोलीस स्टेशन चंद्रपूर शहर व रामनगर येथील आणि वर नमूद विविध शाखा/ विभागाचे अधिकारी व अंमलदार यांनी मोलाची कामगिरी केली आहे.

# पोटा येथे अध्यात्मिक बाल संस्कार शिबीराचा समारोप

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२६, नागपूर :** श्री संत फुटाणे महाराज उत्सव समिती पोटा तालुका सावनेर जिल्हा नागपूर तर्फे मागील २१ दिवसापासून आयोजित आध्यात्मिक बालसंस्कार शिबिराचा समारोप नुकताच बक्षिसे आणि प्रमाणपत्रे देऊन संपन्न झाला. नागपूर, भंडारा, अमरावती, चंद्रपूर जिल्ह्यातील चिमुकल्या मुलांसाठी हे आध्यात्मिक बालसंस्कार शिबिर आयोजित करण्यात आले होते. शिबिरा दरम्यान योगासना पासून ते तबला वादन, वारकरी वेशभूषा, अभंग, गीता, हरिपाठ पठण व नृत्य यासह इत्यंभूत माहिती देण्यात आली. यासंदर्भात संस्थेचे चंद्रशेखर लांडे यांनी शिबिरा विषयी माहिती देताना सांगितले की, शिबिरात चिमुकले मुले आल्यानंतर ३-४ दिवस त्यांची खूप काळजी घ्यावी लागते. रात्रभर जागून मुलांच्या दैनंदिन दिनचर्येवर लक्ष ठेवावे लागते. कारण चिमुकल्या मुलांना त्यांचे पालक आणि कुटुंब २१ दिवस आध्यात्मिक बालसंस्कार शिबिरात पाठवतात. सदर चिमुकल्या मुलांची संस्थेच्या वतीने मोफत राहण्याची आणि जेवणाची व्यवस्था केली जाते. यातील अनेक चिमुकले आपल्या घरी जाण्यासाठी उत्सुक असतात. मात्र, शिबिरा दरम्यान प्रवचन व कीर्तनकार वारकरी संप्रदायाचे महत्व पटवून सांगतात त्यामुळेच शिबीर यशस्वी होत असल्याचे सांगितले.



कार्यक्रमाच्या शेवटी, कीर्तनकार प.पू. देवराव महाराज वनवे, सुधाकर महाराज वंजाळ, रामू महाराज चिनपुरे, प्रमोद महाराज काळे यांनी चिमुकल्या मुलांना मोलाचे मार्गदर्शन केले. यावेळी शिबिरातील सर्व चिमुकल्या मुलांना रोख बक्षिसांसह प्रमाणपत्रे वाटप करण्यात आली. विविध परीक्षांमध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनाही बक्षिसे देऊन गौरवण्यात आले. शिबिर यशस्वीतेसाठी नितीन वानखेडे, अमर जैन, चंद्रशेखर लांडे, संजय वंजाळ, आकाश गोमकाळे, शंकर हावडे, धनराज गायकवाड, प्रणय कोरडे, रमेश कोरडे, रोशन वानखेडे, कौत्यय काकडे, शंकरकाकडे, रंगराव ठाकरे, राम विलास पाल, प्रतिक करंडे,ललिता वानखेड़े, जानवी ठाकरे आदींचे मोलाचे सहकार्य लाभले.

# राज्यात ठिकठिकाणी मुसळधार पाऊस, प्रशासनाने सतर्क राहून मदत कार्य करावे

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२६, ठाणे :** राज्यात अनेक भागांत मुसळधार पाऊस सुरू असून विशेषतः मुंबई कोकण पश्चिम महाराष्ट्रात पुढील काही तास जोरदार पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. त्यामुळे प्रशासनाने सतर्कता ठेवून मदत कार्य करावे असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रशासनाला निर्देश दिले आहेत.



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाणे जिल्हा तसेच अधिक पाऊस पडत असलेल्या जिल्ह्यांच्या परिस्थितीचा आढावा घेतला, तसेच आपत्ती व्यवस्थापन अधिकाऱ्यांशी चर्चाही केली. पावसामुळे जनजीवन विस्कळीत होऊ नये, तसेच कोणतीही जीवित किंवा वित्तहानी होऊ नये, यासाठी प्रशासनाने वेळेवर आणि प्रभावी पावले उचलावी, असे निर्देश त्यांनी दिले. संपूर्ण यंत्रणा सज्ज ठेवण्यात यावी, तसेच आवश्यकतेनुसार मदत आणि बचाव कार्य तत्परतेने पार पाडावे. पाण्याने भरलेले रस्ते, पुलांची स्थिती, विजेच्या तारा यावर विशेष लक्ष ठेवावे. मोडकळीस झालेल्या आणि धोकादायक इमारतीत संदर्भात देखील काळजी घ्यावी, मुंबई आणि ठाण्यासारख्या ठिकाणी उपनगरीय रेल्वे वाहतूक सुरळीतपणे सुरू कशी राहील, किंवा जिथे मोठी अडचण येईल तिथे प्रवाशांना त्रास कसा होणार नाही यासाठी सतर्क रहावे असेही त्यांनी प्रशासनाला सांगितले. हवामान विभागाच्या सूचनांचे पालन करावे, आवश्यक नसल्यास घराबाहेर पडू नये, तसेच सखल भागांमध्ये राहणाऱ्यांनी विशेष सावधगिरी बाळगावी. प्रशासन तुमच्या मदतीसाठी तत्पर आहे, मात्र नागरिकांनी देखील सहकार्य करणे गरजेचे आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. राज्यात सध्या मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे आणि नाशिक या जिल्ह्यांत पावसाचा सर्वाधिक जोर दिसून येत आहे. राज्य सरकार परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून असून नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी सर्व उपाययोजना राबविण्यात येत आहेत असेही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

# 'समर कॅम्प' तरुणांना सुपरफिट ठेवण्याचा उपक्रम : आ.मुनगंटीवार

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२६, बल्लारपूर (चंद्रपूर) :** जिल्ह्यातील युवक-युवतींना शारीरिक, मानसिक आणि बौद्धिकदृष्ट्या सक्षम बनवण्यासाठी विविध उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी सुरू झाली आहे. बल्लारपूर येथे दिनांक ०१ मे पासून सुरू झालेल्या उन्हाळी शिबिरात एकूण १५ खेळांचे प्रशिक्षण देण्यात आले असून समाजभान आणि मूल्यसंस्कारांची जोड देणाऱ्या या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक बदल घडत आहेत. हा 'समर कॅम्प' तरुणांना सुपरफिट ठेवणारा प्रभावी उपक्रम असल्याचे प्रतिपादन राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री तथा आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी शिबिराच्या समारोप समारंभात केले. हे शिबिर स्वर्गीय डॉ. सच्चिदानंदजी मुनगंटीवार यांच्या स्मृतीप्रित्यर्थ आयोजित करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे आयोजक शीकांत आंबेकर अध्यक्ष, सुधीरभाऊ फॅन्स क्लब बल्लारपूर, समीर केने, काशी सिंग, मुन्ना ठाकूर, राजू दारी, संदीप पुणे, सुनील यादव, प्रशांत झांबरे, रोहित तुक्कर आदींची उपस्थिती होती. आ. मुनगंटीवार पुढे म्हणाले की, जिल्ह्यातील बल्लारपूर, मुल, पोंभुर्णा आणि चंद्रपूर येथे युवकांसाठी दर्जेदार क्रीडा सुविधा उभारण्यात आल्या आहेत. स्वातंत्र्यसैनिक वीर बाबुराव शेडमाके यांच्या नावाने म्हाडामध्ये उभारले जात असलेले २५ खेळ प्रकारांचे अत्याधुनिक स्टेडियम 'मिशन ऑलिंपिक २०३६' च्या दिशेने भक्कम पाऊल ठरेल, असा विश्वास ही आ.मुनगंटीवार यांनी व्यक्त केला.



विसापूर क्रीडा संकुलात झालेल्या राष्ट्रीय ॲथलेटिक्स स्पर्धेला देशभरातील २८ राज्यांमधून स्पर्धकांनी सहभाग नोंदवला होता. या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनाचे सर्वत्र कौतुक झाले आहे.

समर कॅम्पच्या उत्कृष्ट आयोजनासाठी आ. मुनगंटीवार यावेळी अभिनंदन केले.महिला सक्षमीकरणासाठी कौशल्य विकास उपक्रम - गरजू मुलींसाठी एस.एन.डी.टी. विद्यापीठ व स्व. सुषमा स्वराज स्किल सेंटरच्या माध्यमातून कौशल्य प्रशिक्षण उपक्रम राबवले जात आहेत. या उपक्रमांमधून अनेक मुलींना स्वबळावर उभं राहण्याची संधी मिळत आहे.विसापूर येथे 'आर्चरी सेंटर' सुरू करण्याचे नियोजन असून, युवक-युवतींनी या क्रीडा व प्रशिक्षण सुविधांचा लाभ घ्यावा, असे आवाहन आ. मुनगंटीवार यांनी यावेळी केले.

# शिवरायांनी उभे केलेले गड किल्ल्यांचा इतिहास जपण्याचे काम करु - खासदार लंके

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२६, अहिल्यानगर :** छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेऊन आपण समाजात वावरतो. शिवरायांचे नाव घेतल्याशिवाय आपला दिवसही जात नाही. त्या राजासाठी महिन्यातील एक तरी दिवस दिला पाहिजे तरच आपल्याला 'जय शिवाजी जय भवानी' म्हणण्याचा अधिकार आहे. समाजात दुही निर्माण करण्याचे काम केले जात आहे. त्यामुळे छत्रपती शिवरायांच्या विचारांची गरज आहे. शिवरायांचे विचार घराघरात, मनामनात पोहोचले पाहिजे. हे विचार पुढे न्यायचे असतील तर शिवरायांनी उभे केलेले गड किल्ले व इतिहासाला उजाळा देऊन ते जपण्यासाठी काम करुया असे प्रतिपादन खासदार निलेश लंके यांनी केले. ते दिनांक २५ मे २०२५ रोजी किल्ले रायरेश्वर (ता.भोर) येथील गड किल्ले संवर्धन व स्वच्छता मोहिम प्रसंगी शिव भक्तांसमोर बोलत होते. आपला मावळा संघटनेचा शुभारंभ खासदार लंके यांच्या उपस्थितीत करण्यात आला. यावेळी खासदार लंके यांनी रायरेश्वर मंदीरात महादेवाचे दर्शन व शिवरायांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून उपस्थित शिवभक्तांसमवेत स्वराज्याची शपथ घेऊन मोहिमेस सुरवात करण्यात आली. यावेळी मंदिर परिसरात



स्वच्छता व वृक्षारोपण करून वीज व सौर उर्जाचे दिवे, शिवभक्तांना पिण्याच्या पाण्याचे रांजण, सुचनादर्शक फलक बसविण्यात आले. सभामंडपाच्या खांबांना रंग देण्यात आला. ग्रामस्थांना रेनकोट वाटप केले. पेविंग ब्लॉग, डस्टबीन आदी उपयुक्त वस्तू देऊन विविध उपक्रम राबविण्यात आले. यावेळी जिल्हा परिषदेच्या शाळेची पाहणी खासदार लंके यांच्याकडून करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून गड किल्ले संवर्धन आणि स्वच्छता मोहीम करण्याचा निर्णय घेतला असून आतापर्यंत शिवनेरी व धर्मवीर गडावर स्वच्छता व संवर्धन करण्यात आले आहे. खासदार निलेश लंके हे शिवभक्तांसह दिनांक २४ मे रोजी रात्री गडाच्या पायथ्याशी असलेल्या टिटेघर वडतुंबी येथील विद्यालयात मुक्कामी होते. रविवारी



सकाळी सर्व साहित्य घेऊन शेकडो शिवभक्तांसह गडावर पोहचले. यावेळी लंके यांनी स्वतः हातात झाडू घेऊन मंदिरात स्वच्छता केली. यावेळी वयोवृद्ध, तरुण, महिला व लहान मुले मुली उपस्थित होते. दरम्यान गडाच्या पायथ्याशी नाष्टा व भोजनाची व्यवस्था प्रतिष्ठानकडून करण्यात आली होती.

**पावसात रायरेश्वर गडावर चढाई**

सकाळपासून पावसाची रिपरिप सुरू असतानाही लोखंडी शिडीवरून रायरेश्वर गडावर खा. लंके यांच्यासह वयोवृद्ध, महिला, लहान मुलांसह तरुणांनी वृक्षांची रोपे,टिकाव फावडे, मोठाले रांजण,डस्टबीन, लोखंडी पालकांसह अवजड वस्तू नेल्या. तसेच विज प्रवाह बंद करून पावसात विजेच्या खांबावर चढून दिवे जोडण्याचे काम करण्यात आले.

# ऑपरेशन सिन्दूरच्या यशस्वी प्रतिहल्लयाचा गौरव : कळंबमध्ये भव्य तिरंगा यात्रा

**अक्षराज : अशोक कुलकर्णी**

**दि.२६, कळंब :** आपल्या वीर जवानांच्या शौर्याला सलाम! पाकिस्तानच्या सीमारेषेपलिकडे गेल्यावर आपल्या बहाद्दर सैनिकांनी पहलगामवरील हल्ल्याचा करुण बदला घेतला आहे. हे इतिहासाच्या पानांवर जतन केलेले भारताच्या शौर्याचे, पराक्रमाचे आणि राष्ट्रभक्तीचे त्यामुळे एक अमर उदाहरण ठरले आहे. याच अनमोल शौर्याचा गौरव करण्यासाठी कळंबकरांच्या वतीने एक भव्य तिरंगा यात्रा आयोजित करण्यात आली.




सकाळी १०:०० वाजता हुतात्मा स्मारक, नगर परिषद कार्यालय, कळंब येथून सुरू झालेली ही यात्रा थोडक्यात कळंब शहरात भारताची एकता, अखंडता आणि विविधतेचा संदेश देताना उपस्थित सर्वांमध्ये जोश आणि उत्साह निर्माण करण्यात यशस्वी झाली. या यात्रा विशेषतः सन्माननीय माजी सैनिक, खेळाडू, विद्यार्थिनी, व महिला यांचा समावेश होता, ज्यांनी उत्स्फूर्तपणे भाग घेतला.

यात्रा हुतात्मा स्मारकाहून प्रारंभ करून स्वांतत्र्य वीर सावरकर, अशोक स्तंभ, छत्रपती शिवाजी महाराज, राजमाता जिजाऊसाहेब, पुण्यशलोक अहिल्यादेवी होळकर, आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मानवंदना देत गेली. प्रत्येक ठिकाणी उपस्थितांनी तिरंगा उंचावत जय हिंद!, भारतमाता की जय! हा जयघोष दिला. वातावरनात देशभक्ती चे स्फुरण चढले होते.

यात्रेतील उत्साहात उपस्थित सर्वांनी एकत्रितपणे आपला मान तिरंगा! आपला स्वाभिमान तिरंगा!! या गजरात देशभक्तीच्या भावना व्यक्त केल्या. या ऐतिहासिक घडामोडीने कळंबच्या नागरिकांमध्ये अद्वितीय एकजुटीचा अनुभव दिला, ज्यामध्ये त्यांच्या धैर्य, समर्पण आणि राष्ट्रप्रेमाचे प्रतीक बनले.

यात्रेचा समारोप राष्ट्रगीताने करण्यात आला, ज्यामुळे उपस्थितांनी एकत्र येऊन त्यांच्या देशभक्तीची दृष्टी स्पष्ट केली. कळंबकरांच्या दृष्टीने, हा कार्यक्रम एकतेला बळ देणारा आणि राष्ट्राभिमान जागवणारा ठरला.

कळंबकरानी सर्वांनी या ऐतिहासिक घटनेत सहभागी होऊन वीर जवानांना सन्मान दिला व आपल्या देशाच्या प्राणप्रिय तिरंगा ध्वजाला मानवंदना...

# थोडक्यात

## अवैध रेती उपसा करणाऱ्यांवर प्रशासनाची कारवाई
## कारवाईत अंदाजे ५० लाखांचा मुद्देमाल नष्ट

**दि.२६, ठाणे :** मुंब्रा खाडी परिसरात रेल्वे पुलालगत अवैध रेती उत्खनन सुरू असल्याची माहिती महसूल विभागाला प्राप्त झाली. त्यानुषंगाने ठाणे उपविभागीय अधिकारी उर्मिला पाटील तसेच ठाणे तहसिलदार उमेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखालील पथकाने दि.२५ मे २०२५ रोजी मुंब्रा ते कल्याण दरम्यान रेल्वे ट्रॅकजवळील खाडी परिसरात गस्त घालण्याची कार्यवाही राबविली.

या गस्त दरम्यान दिवा खाडीमध्ये एक बोट (बार्ज) आणि सक्शन पंपच्या सहाय्याने अवैध रेती उत्खनन होत असल्याचे आढळून आले. महसूल विभागाच्या पथकाने तत्काळ हस्तक्षेप करीत बार्ज व सक्शन पंप खाडीमध्येच बुडवून नष्ट केले. नष्ट करण्यात आलेल्या मुद्देमालाची अंदाजे किंमत ५० लाख रुपये इतकी आहे.

या कारवाईमुळे खाडी परिसरात सुरू असलेल्या अवैध रेती उपशावर आळा बसणार असून पुढील काळातही अशी कारवाई सातत्याने सुरू ठेवली जाणार आहे, असे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

या कारवाईत बाळकुम मंडळ अधिकारी शशिकांत जगताप व त्यांचे सर्व ग्राम महसूल अधिकारीही सहभागी झाले होते.

## वाळावणे येथील पठारे वस्तीवर चोरांचा सुळसुळाट!

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि२६, सुपा (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यातील वाळावणे येथील पठारे वस्ती येथे दि.२४ रोजी मध्यरात्रीच्या वेळी दोन,ते तीन वस्त्यावर चोरांनी डाका टाकण्याचा प्रयत्न केला. शेवटी चोरांनी पठारे वस्तीवरील राहणारे कांताबाई भास्कर पठारे यांच्या घरी डाका टाकुन ११ग्रॅम सोन्याचे दागिने चोरट्यांनी चोरुन पसार झाले.



नंतर दुसर्या दिवशी सुध्दा चोरट्यांनी परत पठारे वस्तीवर परत चोरी करण्याच्या हेतुने प्रयत्न केला पण, वस्तीवरील लोकांच्या सर्तकतेमुळे चोरांचा चोरी करण्याचा डाव फसला, वस्तीवरील लोकांनी आरडाओरड केल्याने चोरटे पसार झाले कांताबाई भास्कर पठारे यांनी सदर सुपा पोलिस स्टेशनला केस दाखल केली असुन, सदर गुन्ह्याचा तपास पोलिस करीत आहेत.

## कलावंतांना मानधनासाठी शासन दरबारी प्रयत्न करणार - सुजित झावरे पाटील

### माळकूप येथे वारकरी संप्रदायाची बैठक

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२६, पारनेर (अहिल्यानगर) :** महाराष्ट्र राज्य वारकरी संप्रदाय मंडळाच्या वतीने माळकुप येथे भजनी मंडळ आणि वारकरी संप्रदायातील प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत कलाकारांचे मानधन भजनी मंडळांना शासनाकडून मिळणारे साहित्य आणि सुविधा यावर चर्चा झाली. यावेळी सुजित झावरे पाटील यांनी वारकरी संप्रदायाच्या कलाकारांना मानधन आणि भजनी मंडळांना साहित्य मिळावे. यासाठी राज्य शासनाकडे पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. सातारा पुणे शिरूर आणि पारनेर यासारख्या विविध भागांतून वारकरी कार्यक्रमासाठी उपस्थित होते. माळकूप येथील श्री स्वामी समर्थ मंदिरासाठी यापूर्वीच दिलेल्या निधीचा उल्लेख करत सुजित झावरे पाटील यांनी मंदिराच्या विकासकामांसाठी भरीव मदत करण्याचे जाहीर केले. भौतिक सुखे मिळतील पण श्रद्धा कधीही डगमगू देऊ नका. सुखात किंवा दुखात, ही श्रद्धा उभे राहतील. परंतु जी श्रद्धा तुमच्या मनामध्ये परमेश्वरा विषय अढळ ठेवा. असे भावनिक आवाहन त्यांनी उपस्थित भाविकांना केले. यावेळी वारकरी संप्रदाय वतीने सुजित झावरे पाटील यांचा सत्कार करून सन्मान करण्यात आला. बैठकीला महाराष्ट्र राज्यातील अनेक नामवंत भजनी मंडळाचे कलाकार आणि वारकरी संप्रदायाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## अखिल भारतीय समता परिषद धाराशिवच्या वतीने मंत्री भुजबळ यांचा सत्कार



**अक्षराज : संगीता वनकळस**

**दि.२६, धाराशिव :** महाराष्ट्र राज्याचे नवनियुक्त अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री ना. छगन भुजबळ यांचा अखिल भारतीय समता परिषद धाराशिव जिल्ह्याच्या वतीने सर्व तालुकाध्यक्ष व पदाधिकाऱ्यानी महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानीची प्रतिमा कवड्याची माळ व प्रसादरुपी आशीर्वाद देऊन सत्कार करण्यात आला. मंत्री ना. भुजबळ यांच्या बांद्रा येथील निवासस्थानी झालेल्या या सत्कार समारंभात अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद धाराशिवच्या वतीने जिल्ह्यातील कार्याचा आढावा सादर करण्यात आला. यावेळी अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे मराठवाडा प्रदेश अध्यक्ष, आबासाहेब खोत, धाराशिव जिल्हाध्यक्ष विभीषण खुणे, जिल्हा कार्याध्यक्ष संतोष डोरले, कळंब तालुकाध्यक्ष प्रशांत वेदपाठक, धाराशिव तालुकाध्यक्ष रॉबिन बगाडे, तुळजापूर शहराध्यक्ष मनोज वाघमारे यांच्यासह धाराशिव जिल्ह्यातील अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.